# देगलूर महाविद्यालयाच्या बोडकेला राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक



देगलूर : महाराष्ट्र शासनाच्या वतीने चंद्रपूर येथे आयोजित राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील १२ वीत शिकत असलेला एनसीसी कॅडेट विद्यार्थी जरासंध दुर्योधन बोडके या खेळाडूने ७९ कि.ग्रॅ. फ्री-स्टाईलमध्ये राज्यातून प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक प्राप्त केले.

जरासंधला प्रशिक्षक म्हणून क्रीडा शिक्षक प्रा. सीताराम हाके, डॉ. नीरजकुमार उपलंचवार व प्रा. दीपक वावधाने यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे अभिनंदन अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार यांच्यासह नारायणराव मैलागिरे, सूर्यकांत नारलावार, विलास तोटावार व कार्यकारिणी सदस्य राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उंग्रतवार, देवेंद्र मोतेवार, गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्रअप्पा, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एम. एम. चमकुडे, प्रसिद्धीप्रमुख डॉ. बी. आर. कतुरवार, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी-नळगीरकर आदींसह अनेकांनी अभिनंदन केले.

Scanned with OKEN Scanner